# Economics
## Paper III
## अर्थशास्त्र
## प्रश्नपत्रिका III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 200**

*Instructions* :—This paper has **four (4)** Sections. Each Section has its own separate instructions regarding the length of the answer, the choice of questions and the marks assigned to each question to be answered. There are totally Nineteen (**19**) questions to be answered. Maximum marks are **200.**

**सूचना** : या प्रश्नपत्रिकेत एकूण **चार (4)** भाग आहेत. प्रत्येक भागात त्या भागाच्या स्वतंत्र सूचना दिल्या आहेत. त्यात उत्तराची अपेक्षित लांबी, प्रश्नांची निवड व प्रत्येक प्रश्नाला असलेल्या गुणांविषयी माहिती आहे. एकूण **19** प्रश्नांची उत्तरे देणे आवश्यक आहे. कमाल गुण **200** आहेत.

## SECTION I
## (भाग I)

*Instructions* :—In this section you have to attempt **2** (Q. No. **1** and Q. No. **2**) questions of about **500** words each. Select *one* question from Q. No. **1(*a*)** to Q. No. **1(*e*)** and *one* question from Q. No. **2(*a*)** to Q. No. **2(*e*)**. Each question is assigned **20** marks.

**सूचना** :— ह्या भागामध्ये तुम्हाला प्रत्येकी **500** शब्दांत **2** (प्र. क्र. **1** व प्र. क्र. **2**) प्रश्नांची उत्तरे लिहावयाची आहेत. प्रश्न क्र. **1(*a*)** ते **1(*e*)** पैकी एक प्रश्न निवडा. प्रश्न क्र. **2(*a*)** ते **2(*e*)** पैकी एक प्रश्न निवडा. प्रत्येक प्रश्नाला **20** गुण आहेत.

1. (*a*) State the assumptions of classical linear regression model. Explain the use of each one in the OLS estimation.

1. (*b*) Explain how aggregate output and employment are determined under Keynesian model.
केन्सच्या प्रतिमानात सकल उत्पादन व रोजगार कसा ठरतो ते स्पष्ट करा.

1. (*c*) What do you understand by foreign exchange speculation ? How does the speculation occur in forward market ?
तुमच्या मते विदेशी चलनाचे परिकल्पन म्हणजे काय ? वायदाबाजारात परिकलन कसे घडून येते ?

1. (*d*) Comment on the restructuring of Regional Rural Banks (RRBs) in India.
भारतातील क्षेत्रीय ग्रामीण बँकांच्या पुनर्रचनेवर भाष्य करा.

1. (*e*) Examine the trends in Expenditure of Central Government since 1991.

1991 पासून केंद्र सरकारच्या खर्च प्रवृत्तींचे परीक्षण करा.

2. (*a*) State the problem of heteroscedasticity in the linear regression model. Discuss the methods to detect this problem.

2. (*b*) "It is always possible to maximine sales revenue in Baumol's model." Discuss.

''बोमोलच्या प्रतिमानात (उद्योगसंस्थेला) विक्री प्राप्ती महत्तमीकरण नेहमीच करता येते.'' चर्चा करा.

2. (*c*) Discuss how the world trading system evolved. What are the controversies regarding present world trading system ?

जागतिक व्यापार व्यवस्थेची उत्क्रांती कशी झाली याची चर्चा करा. जागतिक व्यापार व्यवस्थेबाबत सद्याचे वादग्रस्त मुद्दे कोणते ?

2. (*d*) What are the challenges before agricultural sector in India ? Comment in the light of developments during the 9th and 10th Plans in India.

भारतातील शेती क्षेत्रापुढील आव्हाने कोणती ? नवव्या व दहाव्या पंचवार्षिक योजनांच्या कालखंडातील प्रगतीच्या संदर्भात भाष्य करा.

2. (*e*) Examine the outcome of the implementation of Fiscal Responsibility and Budget Management Act, 2003 in India.

भारतात राजकोषीय जवाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायदा, 2003 च्या अंमलबजावणीच्या निष्पत्तीचे परीक्षण करा.

## SECTION II
## (भाग II)

*Instructions* :—There are **3** (*three*) (Q. No. **3** to Q. No. **5**) questions to be answered, each in about **300** words. These questions are based on the electives. Select *one* elective out of *five* electives and answer **3** (*three*) questions given below it. Each question is assigned **15** marks.

**सूचना** :— या भागात **3** (**तीन**) (प्र. क्र. **3** ते प्र. क्र. **5**) प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **300** शब्दांत लिहावयाची आहेत. हे प्रश्न **पाच** पर्यायी विषयासंबंधी आहेत. त्या **पाच** पर्यायांपैकी कोणताही **एक** पर्यायी विषय निवडा व त्याखालील **3** (**तीन**) प्रश्नांची उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाला **15** गुण आहेत.

### Elective I

3. What are the reasons for the existence of heteroscedasticity in econometric models ? Describe the Goldfeld-Quandt test to detect heteroscedasticity for the model $Y_i = \beta_1 + \beta_2 X_i + u_i$.

4. What is the difference between ARMA and an ARIMA process ? Describe the Box-Jenkir's methodology to identify the processes.

5. Suppose one wants to test whether autonomous consumption and marginal propensity to consume have both shifted after liberalisation in India. How can one do this using Dummy variables ? Explain the Dummy variable trap and way to overcome it.

*Or*

**(किंवा)**

### Elective II

3. Why monopoly is inefficient ? How the inefficiency of monopoly is measured ? Explain.
   मक्तेदारी अकार्यक्षम का असते ? मक्तेदारीच्या अकार्यक्षमतेचे मापन कसे केले जाते ? स्पष्ट करा.

4. Derive aggregate demand curve when prices are flexible in IS-LM framework. Explain the impact of expansionary fiscal policy on price level and output in Keynesian and classical case.
   IS-LM च्या चौकटीत नम्य किंमतींच्या परिस्थितीत एकूण मागणी वक्राची व्युत्पत्ती दर्शवा. विस्ताराच्या राजकोषीय धोरणाचा किंमत पातळीवर आणि उत्पादनावर केन्शीयन आणि अभिमतपंथीय चौकटीत होणारा परिणाम स्पष्ट करा.

5. State the assumptions under which Solow's Model is different from Harrod's Model. Explain the conditions of stability in Solow's Model.
   सोलोचे प्रतिमान हॅरॉड प्रतिमानापेक्षा कोणत्या गृहितांच्या संदर्भात भिन्न स्वरूपाचे आहे ते दर्शवा. सोलोच्या प्रतिमानातील स्थिरीकरणाच्या अटी स्पष्ट करा.

*Or*

**(किंवा)**

**Elective III**

3. Define 'New Protectionism'. Discuss the various problems related to it.
नवसंरक्षणवादाची व्याख्या करा. त्याच्याशी संबंधित विविध प्रश्नांची चर्चा करा.

4. What is meant by foreign exchange speculation ? How does speculation take place in spot market ?
विदेशी चलनाचे परिकल्पन म्हणजे काय ? हजर बाजारात परिकल्पन कसे घडून येते ?

5. Discuss the dispute settlement machinery in the WTO.
जागतिक व्यापार संघटनेत विवाद दूर करणारी यंत्रणा स्पष्ट करा.

*Or*

**(किंवा)**

**Elective IV**

3. What were the measures taken by the Government to improve farm productivity in India ? How far were they successful ?
भारतात कृषि उत्पादकता सुधारण्यासाठी कोणते उपाय योजले गेले ? ते कितपत यशस्वी झाले ?

4. Attempt a critical review of the working of Commission for Agricultural Costs and Prices in India.
भारतातील कृषी खर्च आणि किंमत आयोगाच्या कामगिरीच्या टीकात्मक आढावा घ्या.

5. Examine the measures taken by the Government to improve agricultural marketing in India.
भारतात कृषि विपणन सुधारण्यासाठी सरकारने केलेल्या उपाययोजनेचे परीक्षण करा.

*Or*

**(किंवा)**

**Elective V**

3. Comment on the strategy of inclusive growth followed by 11th Five Year Plan 2007-12.
सन 2007-12 या कालखंडातील भारताच्या अकराव्या पंचवार्षिक योजनेतील सर्वसमावेशक अभिवृद्धीच्या व्यूहरचनेवर भाष्य करा.

4. Assess critically the measures taken by the Government to control price inflation in India.
भारतात जलद किंमतवाढ रोखण्यासाठी सरकारने जी उपाययोजना केली तिचे टीकात्मक परीक्षण करा.

5. Attempt a critical review of the disinvestment policy pursued by the Government in the last two decades.
गेल्या दोन दशकात सरकारने जे निर्गुंतवणुकीचे धोरण राबवले त्याचा चिकित्सक आढावा घ्या.

3.

4.

5.

## SECTION III

## (भाग III)

*Instructions* :—In this section you have to answer all the **9** (Q. No. **6** to Q. No **14**) questions, each in about **50** words. Each question carries **10** marks.

**सूचना** :— या भागातील सर्व **9** (प्र. क्र. **6** ते प्र. क्र. **14**) प्रश्नांची उत्तरे लिहावयाची आहेत. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर साधारणपणे **50** शब्दांत लिहा. प्रत्येक प्रश्नाला **10** गुण आहेत.

6. Define marginal revenue product and value of marginal product. How are they related with each other when there is perfect competition in product market ?

सीमान्त आगमरूप उत्पादित आणि सीमान्त उत्पादनाचे मूल्य यांच्या व्याख्या लिहा. जेव्हा वस्तू बाजारात पूर्ण स्पर्धा असते तेव्हा या दोहोत काय संबंध असतो ?

7. Define compensated demand curve.
क्षतिपूर्ती मागणी वक्राची व्याख्या लिहा.

8. State how Tobin's demand for money approach is different from Keynesian approach.
पैशाच्या मागणीचा टोबीनचा दृष्टीकोन केन्सच्या दृष्टीकोनापेक्षा कसा वेगळा आहे ते सांगा.

9. What is the major assumption which leads to vertical shape of aggregate supply curve ?
कुठल्या महत्वपूर्ण गृहितामुळे सकल पुरवठा वक्र क्षितिजलंब होतो ?

10. Discuss globalization with reference to the movement of factor inputs.
घटक आदानांच्या संदर्भात जागतिकीकरणावर भाष्य करा.

11. Write a brief note on Hedging.
'बचाव' यावर थोडक्यात टीप लिहा.



P.T.O.

12. What are the objectives of introducing Goods and Services Tax (GST) in India ?

भारतात वस्तू आणि सेवा कर आकारणीस सुरुवात करण्याचा हेतू काय ?

13. Elaborate in brief the factors affecting cropping pattern in India.
भारतातील पीक संरचनेवर परिणाम घडवून आणणारे घटक थोडक्यात विशद करा.

14. If the demand function is given as $P = 18 - 2x - 3x^2$ and consumer buys 2 units, compute the consumer's surplus.
समजा, मागणी फलन $P = 18 - 2x - 3x^2$ असे दिले असेल आणि उपभोक्त्याने 2 नग खरेदी केले असतील तर यावरून ग्राहकाच्या संतोषाधिक्याचे मापन करा.

## SECTION IV

## (भाग IV)

*Instructions* :—A paragraph is given below. Please read it carefully and answer the questions (Q. No. **15** to Q. No. **19**) following it, each in about **30** words. Each question is assigned **5** (*five*) marks.

The story of regulation in the power sector contrasts sharply from that in the telecom sector in India. There are three main reasons for this divergence. First, privatization has not yielded any significant results in the power sector. The political economy bias in favor of the status quo was far more entrenched in this sector. Second, in addition to problems caused by the inability by the distribution companies to charge reasonable tariffs, especially from the agricultural sector, difficulties stemmed from the fact that the World Bank played a more direct role in setting policy agendas in power sector, compared to its far less influential position in telecom reforms. The divergent outcomes across the two sectors highlight the absence in the power sector, of a homegrown approach to institutional and policy reform which had been so much in evidence in the telecom sector reforms. Third, since the power sector lay in the concurrent list of the Indian Constitution, much of the regulatory action was at the state level of the India's Federal System. Numerous State Electricity Regulatory Commissions (SERCs) had a tough time fighting the politically entrenched State Electricity Boards (SEBs). Such has been the level of disillusionment with Government monopolies at the state level that the World Bank has proposed that the power of the regulators be curbed and executive authority be enhanced, even as the Electricity Act of 2003 has enhanced the powers of the Central Electricity Regulatory Commission (CERC).

The inability of the power sector to collect revenues from the distribution of power has contributed significantly to India's fiscal deficit. In 2002-03, the aggregate fiscal deficit of the states was 4.7 percent of GDP. The losses of the State Electricity Boards was at Rs. 2.4 trillion ($ 53.3 billion) alone were equal to 1 percent of India's GDP. Between 1992-93 and 2001-02 the percentage of power supply costs recovered through the average tariff declined from 82.2 percent to 68.6 percent. Pilferage accounted for about 40 percent of the electricity generated. The puzzle for generating competition in the power sector was how to involve power sector in an area where a majority of customers were not used to paying tariffs.

**सूचना** :— खालील एक परिच्छेद दिला आहे. तो कृपया काळजीपूर्वक वाचा व त्याखालील प्रश्नांची (प्र. क्र. **15** ते प्र. क्र. **19**) प्रत्येकी साधारण **30** शब्दांत उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाला **पाच** (**5**) गुण आहेत.

भारतातील वीज क्षेत्राच्या नियमनाची कथा दूरसंचार क्षेत्रातील परिस्थितीच्या बरोबर उलट परिस्थिती दर्शविते. या विरोधामागे तीन प्रमुख कारणे आहेत. पहिले म्हणजे खासगीकरणाने वीज क्षेत्रात फारसे काही लक्षणीय बदल घडवून आणले नाहीत. या क्षेत्रातील राजकीय अर्थनीतीचा कल जैसे थे परिस्थिती ठेवण्याकडे ठामपणे झुकला होतो. दुसरा मुद्दा म्हणजे वितरण कंपन्यांनी विजेचे रास्त दर आकारण्यास, विशेष करून शेती क्षेत्रामध्ये, असमर्थता दाखवल्याने अनेक समस्या निर्माण

झाल्या. तसेच दूरसंचार क्षेत्रातील सुधारणांबाबत जागतिक बँकेची भूमिका मुळीच प्रभावी नव्हती, पण वीज क्षेत्रातील धोरणांच्या तपशीलाबाबत जागतिक बँकेचा सरळ सरळ सहभाग होता व तेथून अनेक समस्या निर्माण झाल्या. या दोन क्षेत्रांची परस्पर विरोधी कामगिरी दिसते त्यामागे एक गोष्ट अधोरेखित होते. दूरसंचार क्षेत्रात संस्थात्मक आणि धोरणात्मक सुधारणांसाठी जो एतद्देशीय दृष्टिकोन होता त्याचा वीज क्षेत्रात पूर्ण अभाव होता. तिसरे म्हणजे वीज क्षेत्राचा भारतीय राज्यघटनेच्या सामायिक सूचीत समावेश आहे व भारतीय संघराज्यात नियमनाची बहुतांश कार्यवाही राज्यपातळीवर करावी लागते. अनेक राज्य वीज नियामक आयोगांना राजकारणात बुडालेल्या jkT; olt eaMYkakh nks gkr djkosy kxysvkgs- jkT; ikrÿhojhy ljdkjh eDrsk ल्यांबाबत जागतिक बँकेचा इतका पराकोटीचा भ्रमनिरास झाला की 2003 च्या वीज कायद्याने जरी केंद्रीय वीज नियामक आयोगाचे अधिकार वाढवलेले असले तरी अशा नियामक मंडळांचे अधिकार कमी करावेत व शासनयंत्रणेचे अधिकार वाढवावेत असे जागतिक बँकेने प्रस्तावित केले.

वीज वितरण करून त्यातून उत्पन्न मिळवणे शक्य न झाल्याने भारतात वित्तीय तूट सरळ सरळ वाढत गेली आहे. सन 2002-03 या वर्षी राज्यांच्या एकूण वित्तीय तुटीचे प्रमाण स्थूल देशान्तर्गत उत्पन्नाच्या 4.7% होते. सर्व राज्य वीज मंडळांचा एकूण तोटा रु. 2.4 ट्रिलियन (53.3 बिलि. डॉलर्स) होता व तो भारताच्या स्थूल देशान्तर्गत उत्पादनाच्या 1% इतका होता. सन 1992-93 ते 2001-02 या दरम्यान विजेचा पुरवठा खर्च वीज दरामार्फत वसूल करण्याचे प्रमाण 82.2% वरून 68.6% पर्यंत घसरले. वीज निर्मितीच्या 40% वीज चोरली जात होती. बहुतांश वीज ग्राहक बिले भरण्याच्या भानगडीत पडत नसल्याने वीज क्षेत्रात स्पर्धा कशी अमलात आणावी हे एक कोडेच आहे.

15. How does the regulation in power sector of India contrast from that in the telecom sector ?
दूरसंचार क्षेत्राच्या तुलनेने वीज क्षेत्राच्या नियमन प्रक्रियेत कसा भेद दिसून येतो ?

16. Why has it been difficult to implement power sector reforms effectively ?
वीज क्षेत्रातील सुधारणा परिणामकारकतेने अमलात आणणे कठीण का गेले आहे ?

17. How has the Indian power sector been responsible for the country's fiscal deficit ?
देशाच्या वित्तीय तुटीस भारतीय वीज क्षेत्र कसे जबाबदार ठरले ?

18. How do you find a correlation between states' aggregate fiscal deficit and the losses of the State Electricity Boards ?
राज्यांच्या वीज मंडळांचे तोटे व देशाची एकूण वित्तीय तूट यांच्यातील परस्परसंबंध तुमच्या मते कसा आहे ?

19. Why was there a problem in generating competition in power sector of the country ?
देशाच्या वीज क्षेत्रात स्पर्धा निर्माण करताना समस्या का निर्माण झाली ?

## ROUGH WORK

ROUGH WORK